REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख ८ मार्च, १९५० अंक १०


## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी ५१५ बुधवार — अधिक माहितीसाठी लिहा.
रा. गों. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

## सी. पी. अँड बेरार (मध्यप्रदेश) प्रोव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर.

स्थापनाः—१९१२.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. १०,२४,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ११,२६,००० |
| खेळतें भांडवल | रु.२,४९,६४,००० |

अध्यक्षः— सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.

बँकिंगचे सर्व व्यवहार होतात.

बँकेचे शेअर्सची विक्री चालूं आहे. गेल्या ४ वर्षांची मुनाफा वांटणी पांच दरानें केली.

सरकारची पूर्ण हमी असलेले शेंकडा तीन व्याजाच्या दराचे रोख्यांची विक्री चालूं आहे. रोख्यांची मुदत १० व १५ वर्षांनीं भरेल.

विमा कंपन्या, बँका, म्युनिसिपालिट्या, शाळा, जमीनदार वगैरेंनीं वरील रोखे जरूर खरेदी करावेत.

गो. आ. भोंसुले,
मॅनेजर.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१५,५२५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. — श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर. — श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.


## विविध माहिती

**पंजाब नॅशनल बँकेच्या नफ्यांत घट**—पंजाब नॅशनल बँक लि. ह्या बँकेला १९४९ सालीं १९४८ सालाच्या मानानें बराच कमी नफा झाला. १९४८ सालीं बँकेला ५४,७८,८५७ रु. नफा झाला होता. १९४९ सालीं ३०,१२,६९६ रु. नफा झाला. तथापि संचालक मंडळानें भागांवर ६ टक्के कर-माफ नफा देण्याचें ठरविलें आहे.

**भारताची जननसंख्या**—भारताच्या विधिमंडळांत एका सभासदानें संततिनियमनाचीं साधनें आणि माहिती सर्व देशभर सुलभ करण्यांत यावी अशी सूचना केली होती. त्या सूचनेला उत्तर देतांना मध्यवर्ती सरकारच्या आरोग्यमंत्री श्रीमती अमृत कुवर म्हणाल्या कीं देशांतील दर हजारीं जननसंख्या घटत चालली आहे. १९२१-२५ ह्या पांच वर्षांत जननसंख्या दर हजारीं ३३·२ इतकी होती. १९४८ सालीं २५·४ इतकी खालीं आली आहे.

**खताच्या उत्पादनाला मदत**—शेतांत खताच्या उत्पादनासाठीं खड्डे खणण्याला मदत म्हणून मुंबई सरकारनें खेडेगांवांतील ग्राम कमिट्यांना दर खड्ड्यामागें दोन रुपये मदत म्हणून देण्याचें ठरविलें आहे. पूर्वी ही मदत व्यक्तिशः शेतकऱ्याला देण्यांत येत असे. ग्रामसुधारणेच्या कामाला मदत करण्याच्या हेतूनें हा बदल करण्यांत आला आहे.

**जागतिक बँकेकडून भारताला नवीन कर्ज**—दामोदर नदीवरील धरणांच्या योजनेंतील बोकारो ह्या पोटधरणासाठीं जागतिक बँकेकडून २ कोटी डॉलर्सचें कर्ज भारताला मिळणार आहे असें समजतें. ह्या धरणासाठीं २॥ कोटी डॉलर्स कर्जाऊ देण्याची बँकेची तयारी होती. परंतु धरणाला लागणारी कांहीं यंत्रसामुग्री पश्चिम युरोपांत स्वस्त मिळूं शकत असल्यानें आतां इतक्या कर्जाची जरूर नाहीं. हें कर्ज घेतल्यानंतर, भारतानें बँकेकडून घेतलल्या एकूण कर्जाची रक्कम सुमारें ६·५ कोटी डॉलर्स होईल.

**जपानचा परदेशीय व्यापार**—गेल्या सालीं जपाननें आपल्या परदेशीय व्यापारापैकी ७८ टक्के व्यापार डॉलरच्या कक्षेंतील देशांशीं केला आणि २२ टक्के पौंडाच्या कक्षेंतील देशांशीं केला. ऑस्ट्रेलिआ, ब्रह्मदेश आणि सयाम ह्या देशांतन अन्नपदार्थांची आयात केल्यामुळें पौंडाच्या कक्षेंतील देशांतून केलेली जपानची आयात वाढली. जपानच्या परदेशी व्यापारापैकी ४४ टक्के वहातूक अमेरिकन बोटींनी केली.

## शेअर बाजार कां वाढला नाहीं ?

( पान ७८ वरून चालू )

आज तागायत. म्हणजे बजेटमधील आगामी अनुकूल योजनांचे प्रतिबिंब बजेटअगोदरच बाजारभावांत उतरलें होतें, म्हणून बजेटची तेजी बजेट अगोदरच झालेली आहे असे म्हणणें प्राप्त होतें. मात्र जर कां यापैकीं एकादाही अपेक्षेला हरताळ फासला गेला असता तर बाजारभाव निश्चित कोलमडले असते. ते मात्र आतां अपेक्षापूर्तीनें कोलमडूं नयेत व बजेट नंतर भाव आहेत तेथेंच स्थिर राहण्यास हरकत नाहीं. पण, एक मोठ पण आहे.

अर्थमंत्र्यांनीं चालूं करपातळींत बजेटांत नऊ कोटींचा वाढावा धरला आहे आणि त्यांतच बोलून ठेवलें आहे कीं, देशाच्या उत्पन्नापैकीं आठ आणे ज्या लष्करी खर्चांत जातात त्या लष्करानें पाकिस्ताननें चालवलेल्या अत्याचारामुळें जर आणखी मागणी केली नाहीं तर हा वाढवा आहे. सर्वांना पाकिस्ताननें काय प्रलय मांडलेला आहे तो दिसतच आहे आणि म्हणून लष्करी खर्च वाढण्याची शक्यता समोर असतां भाव उंचावूं शकत नाहींत. याबरोबरच हल्लीं सर्वसाधारण व्याजाचा दर पांच टक्के पडत असतां चालूं भाव घटावयास हवेत हेंही दिसत आहे. तेव्हां तेजीला तोही अडसर बसलेला आहे. बजेटांत प्रत्यक्षांत कॉर्पोरेशन करांत वाढच झालेली आहे ती निःसंशय भंगकारक आहे. ज्या गुंतविणारांच्या जोरदार पाठिंब्यामुळें बाजारांत तेजी होते ते बाजारांत अजून चालेले नाहींत. भांडवलाची उत्पत्ति बचतींतून होत असते. ज्या मध्यमवर्गाच्या जिवावर ती होत असते तो अजून महागाईच्या खाईंतच आहे. त्यांतल्या वरच्या थरांतल्या लोकांना देऊं केलेली सवलत अमलांत येऊन त्यांनीं बचत करून ती शेअरबाजारांत यायला अजून फार अवकाश आहे. दुसरे, उद्योगधंद्यांना अजूनही स्वस्त कच्च्या मालाची वाण चालूंच आहे—आणि त्यांत कपास प्रमुख आहे—आणि ती आहे तोंपर्यंत बजेटांतील मलमपट्ट्यांचा उद्योगधंद्याच्या जखमांना कांहीं उपयोग नाहीं, कीं त्यांचे नफे वाढणार नाहींत. या व इतर कांहीं अनुत्तेजनात्मक गोष्टी आणि पाकिस्तानचा संभाव्य संघर्ष यामुळें बाजारांत अंतरीं भीतीचें वातावरण आहे. कोठें स्फोट झाल्यास भाव सरसर खालीं येतील अशीच आमची मनोदेवता सांगते.

**कलकत्त्यामधील बँका**—कलकत्त्यामधील, कलकत्ता नॅशनल बँक ही शेड्यूल्ड बँकही रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या बँकांच्या एकत्रीकरणांत सामील होणार आहे असें समजतें. बँकेच्या संचालक मंडळानें तसा ठराव करून मूळ योजनेंतील ४ बँकांच्या एकत्रीकरणांत सामील होण्याचें ठरविलें आहे.

**धारवाडला आयुर्वेद कॉलेज**—मुंबई प्रांताचें सरकार धारवाड येथें आयुर्वेदाचें शिक्षण देणारें एक कॉलेज काढण्याचा विचार करीत आहे असें समजतें.

**संयुक्त प्रांतांतील जमीनदारी फंड**—संयुक्त प्रांतांतील शेतकऱ्यांनीं भूमिदारीचे हक्क मिळविण्यासाठीं जो फंड जमवावयाचा आहे, त्याची रक्कम आता १५ कोटी रुपयांच्यावर गेली आहे. फेब्रुआरी महिन्याच्या १७ तारखेपर्यंत एकूण १५,७७,६४२ भूमिदारी हक्कांच्या सनदा देण्यांत आल्या.


—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ८ मार्च, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मध्यवर्ती नव्या अंदाजपत्रकांतील उत्पन्न-खर्च

(आंकडे कोटी रुपयांचे)

| | १९४९-५० दुरुस्ती | १९५०-५१ अंदाज |
|---|---|---|
| उत्पन्न | रु. ३३२.३६ | रु. ३३९.१९ |
| खर्च | रु. ३३६.१० | रु. ३३७.८८ |
| तूट | रु. ३.७४ | — |
| वाढावा | — | रु. १.३१ |

## गेल्या कांहीं वर्षांचीं अंदाजपत्रकें

(आंकडे कोटी रुपयांचे)

| वर्ष | उत्पन्न | खर्च | वाढावा अथवा तूट |
|---|---|---|---|
| १९४०-४१ | १०७.६५ | ११४.१८ | —६.५३ |
| १९४५-४६ | ३६०.६७ | ४८४.५७ | −१२३.९० |
| १९४७-४८ ( ७½ महिने ) | १७८.७७ | १८५.२९ | —६.५२ |
| १९४८-४९ ( दुरुस्त ) | ३३२.३२ | ३३९.८७ | —१.५५ |
| १९४९-५० (बजेट-पूर्व कराप्रमाणें) | ३०७.७४ | ३२२.५३ | —१४.७९ |
| १९४९-५० ( नव्या कराप्रमाणें ) | ३२२.५३ | ३२२.०४ | —०.४९ |
| १९४९-५० ( दुरुस्त ) | ३३२.३६ | ३३६.१० | —३.७४ |
| १९५०-५१ ( जुन्या कराप्रमाणें ) | ३४७.५० | ३३७.८८ | + ९.६२ |
| १९५०-५१ ( नव्या कराप्रमाणें ) | ३३९.१९ | ३३७.८८ | + १.३१ |

## डॉ. मथाई ह्यांच्या मीमांसासूत्राचें खरें इंगित


लेखक:-प्रा. ना. वि. सोहोनी, एम्. ए., गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स, पुणें.


डॉ. मथाई यांच्या नवीन अंदाजपत्रकावर निरनिराळया दृष्टींनें टीका करतां येईल. किंबहुना कोणीही कसेंही अंदाजपत्रक तयार केलें तरी त्यावर टीका करण्यास फारसें कठीण जाणार नाहीं. तथापि अशा तऱ्हेची टीका करण्याचा फारसा उपयोगही नसतो. म्हणून नवीन अंदाजपत्रकाच्या निरनिराळया अंगोपांगावर टीका न करतां त्यांत अनुस्यूत असलेल्या अर्थशास्त्रीय मीमांसेची चिकित्सा करणें अधिक श्रेयस्कर ठरेल. मुख्य मीमांसासूत्राची चिकित्सा केली म्हणजे सर्व अंदाजपत्रकाची सम्यग् चिकित्सा केल्यासारखेंच आहे.

आपलें अंदाजपत्रक विधिमंडळाला सादर करतांना डॉ. मथाई यांनीं देशाच्या आर्थिक सद्यःस्थितीची स्वतःची मीमांसा विस्तृतपणें मांडली असल्यामुळें अशा प्रकारची चिकित्सा करणें सोपें झालें आहे. डॉ. मथाई यांचें मीमांसासूत्र पुढीलप्रमाणें आहे. "देशांतील सध्यांची चलनवृद्धि ही युद्धकालांतील वारसा म्हणून आम्हांस मिळालेली आहे. सांप्रत जगांतील सर्वच देशांत तिचा जोर आहे. त्याचा परिणाम होऊन आपल्या देशांतील चलनवृद्धि बळावते. जागतिक परिस्थितिवर आमचा कांहींच उपाय चालत नसल्यामुळें तिचे आमच्या आर्थिक परिस्थितीवर होणारे परिणामही आम्हांस टाळतां येत नाहींत. आपल्या देशांतील चलनवृद्धि ही वस्तूंच्या तुटवड्यांतूनच बहुशः निर्माण झालेली आहे; फाजील अगर मोकाट चलनामुळें नव्हे. उत्पादन वाढवून वस्तूंचा पुरवठा वाढविणें हाच त्यावर प्रभावी उपाय आहे. सध्यां प्रचलित असलेल्या करामुळें उत्पादनवाढीस पायबंद बसत आहे. परिणामतः या करांमुळेंच चलनवृद्धि अधिक जोरावत आहे. यासाठी सध्यांचे कर कमी करणें आवश्यक झालेलें आहे. या देशांतील पुष्कळ अर्थशास्त्रज्ञांना माझी ही मीमांसा पटणार नाहीं. परंतु मला प्रामाणिकपणें तसें वाटतें."

डॉ. मथाई यांच्या विस्तृत भाषणांतील विवेचनाचा हा सारांश शक्य तितका त्यांच्याच शब्दांत दिला आहे. त्याची क्रमशः चिकित्सा करणें आवश्यक आहे. प्रथमतः जागतिक परिस्थितीमुळें होणारे परिणाम यासंबंधींचा विवेचनांतील भाग विचारांत घेऊ. जागतिक परिस्थितीचा हिंदुस्थानांतील परिस्थितीवर परिणाम होणें अटळ आहे व ती परिस्थिति आपल्या अधिकारकक्षेबाहेर आहे या दोन्ही गोष्टी सर्वस्वी मान्य करतां येतील. परंतु ही सर्वमान्य विधानें करून डॉ. मथाई जसें उपरणें झटकूं पाहतात तसें मात्र त्यांस करतां येणार नाहीं. यास दोन कारणें आहेत. एकतर हिंदुस्थानाबाहेरील परिस्थिती व्यतिरिक्त अगदीं आपल्याच कर्तृत्वानें हिंदुस्थान सरकार येथील चलनवृद्धि शतगुणित करूं शकते हें विनियंत्रणाच्या प्रयोगानें जाहीर रीतीनें सिद्ध झालेलें आहे. विनियंत्रणाच्या घातकी धोरणामुळें या देशांतील महागाई ६०-७० टक्क्यांनीं वाढली त्यास तर हिंदुस्थान सरकारच सर्वस्वी जबाबदार होतें ना ? गेल्या ३४ वर्षांतील किंमतींच्या चढउतारासंबंधी बोलतांना सुद्धां डॉ. मथाई यांनीं विनियंत्रणाचा उल्लेख केलेला नाहीं. यावरून त्यासंबंधी बोलणें त्यांस गैरसोईचें वाटत असावें असें दिसतें. दुसरें म्हणजे पौंडाच्या व तदनुषंगिक रुपयाच्या अवाहेणानंतर किंमती वाढतील अशी जी भीति वाटत होती त्याचा प्रतिकार करण्यासाठीं आपण जे उपाय योजले त्यामुळें किंमती स्थिरावल्या, निदान वाढल्या नाहींत असें विधान डॉ. मथाई यांनीं आपल्या भाषणांतच केलें आहे. त्यावरून हिंदुस्थान बाहेरील आर्थिक प्रवाहांचे अनिष्ट परिणाम निदान कांहीं अंशीं टाळण्यासाठीं उपाय योजना करता येतात व त्या थोड्याफार प्रमाणांत यशस्वी होऊ शकतात असें म्हणणें प्राप्त होतें. तेव्हां जागतिक आर्थिक परिस्थितीमुळेंच हिंदुस्थानांतील चलनवृद्धि जोरावली आहे असें म्हणून डॉ. मथाई यांस त्यासंबंधींची जबाबदारी इतरांच्या माथीं चिकटवितां येणार नाहीं. त्याचें बरें वाईट श्रेय त्यांचें त्यांनाच घेणें भाग आहे.

डॉ. मथाई यांच्या मीमांसेंतील उरलेला भाग चलनवृद्धि व उत्पादनवाढ यांच्या परस्परसंबंधाचा आहे. हा युक्तिवाद नवीन नाहीं. युद्धकालांतील अर्थमंत्र्यांनीं व इतर सरकारी प्रवक्त्यांनीं तो १९४२ पासून विशेष आग्रहानें पुरस्कारिला होता. डॉ. मथाई यांनीं तो त्या परंपरेनेंच ग्रहण केला आहे. या

युक्तिवादाची तर्कदुष्टता व प्रत्यक्ष व्यवहारांतील घातक परिणाम हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं आतांपर्यंत पुष्कळवेळां दाखवून दिले आहेत. त्याचा गोषवारा थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगतां येईल. देशांतील चलन व वस्तूंचें उत्पादन यांच्या व्यस्त प्रमाणांतूनच चलनवृद्धि निर्माण होते. व्यवहारांतील चलन उत्पादनापेक्षां पुष्कळ पटींनीं वाढलें व उत्पादनवाढीची फारशी शक्यता उरली नाहीं म्हणजे त्यास चलनवृद्धि असें म्हणतात. अर्थात जोंपर्यंत उत्पादन वाढीची शक्यता आहे तोंपर्यंत चलनवृद्धि निर्माण होत नाहीं. उत्पादन वाढ हा चलनवृद्धीवर एकच प्रभावी उपाय आहे असें म्हणणें म्हणजे थोडक्यांत या देशांत सांप्रत चलनवृद्धि अस्तित्वात नाहीं असें म्हणण्यासारखें आहे. तथापि डॉ. मथाई तसें म्हणत नाहींत. उलट चलनवृद्धि आहे असें वारंवार म्हणतात व तार्किक विसंगतीचा दोष पदरीं घेतात.

ही तार्किक विसंगती अप्रतिष्ठित म्हणून क्षणभर गैरलागू ठरविली तरी व्यावहारिक दृष्ट्यासुद्धां ती विसंगत आहे असें सिद्ध करतां येईल. त्यांत मुख्यतः तारतम्याचा भाग येतो. युद्धारंभापासून आतापर्यंत येथील चलन जवळ जवळ ६ पटींनें वाढलें आहे. उत्पादनाची वाढ सर्वसाधारणपणें १० ते ३० टक्क्यांहून अधिक झालेली नाहीं. अंदाजें ६ पटींनें वाढलेल्या चलनामुळें निर्माण झालेल्या चलनवृद्धीस उत्पादन वाढीनें आळा घालावयाचा प्रयत्न करावयाचा तर उत्पादन निदान ७५–१०० टक्क्यांनीं तरी निदान वाढावयास अगर वाढवावयास पाहिजे हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. शिवाय ही वाढ अगदीं अल्पकाळांत म्हणजे १–२ वर्षांत झाली तरच त्याचा उपयोग. कारण चलनवृद्धि नेहमींच वर्धमान असल्यामुळें जितका काळ उत्पादन वाढीला जास्त लागेल तेवढ्या अधिक प्रमाणांत ती वाढेल व तोंपर्यंत झालेल्या उत्पादन वाढीचा ग्रास करील अशी शक्यता असते. इतक्या प्रमाणांत व काळांत आपल्या देशांत उत्पादन वाढविण्याची शक्यता आहे काय? याचें उत्तर सर्वस्वी नाहीं असें आहे. हिंदुस्थानांतील उत्पादनक्षमता कां व कशी कमी आहे यासंबंधींची विस्तृत चर्चा करून वरील उत्तराची सत्यता पटवितां येईल. तथापि त्यास येथें अवसर नाहीं. तुलनात्मक पद्धतीनें तीच गोष्ट थोडक्यांत दाखवितां येईल. उत्पादन वाढीच्या अतीव शक्यता व मर्यादा अमेरिकेच्या उदाहरणांनीं दर्शवितां येतील. हिंदुस्थानापेक्षां नैसर्गिक व मानव निर्मित संपत्तींत अमेरिका कितीतरी पटींनें समृद्ध आहे. जगांतील सर्व देशांतच तिचें स्थान या दृष्टीनें पहिलें आहे. गेल्या महायुद्धाच्या काळांत तेथील औद्योगिक वस्तूंचें उत्पादन ५० टक्क्यांनीं वाढलें. शेतकीचें उत्पन्नही ७५ टक्क्यांनीं वाढलें. ही वाढ होण्यास ५ ते ६ वर्षें लागलीं. अमेरिकेसारख्या देशासुद्धां १।२ वर्षांत आपलें एकंदर उत्पादन ७५ ते १०० टक्क्यांनीं वाढविणें अशक्य आहे, असा याचा स्पष्ट अभिप्राय आहे. हिंदुस्थानची नैसर्गिक संपत्ती, लोकसंख्या, दारिद्र्य यांचा विचार केल्यास अशा प्रकारची उत्पादन वाढ इतक्या थोड्या काळांत होईल अगर करतां येईल ही गोष्ट सुतराम् अशक्यच समजली पाहिजे. तेव्हां उत्पादन वाढीनें येथील चलन वाढीचा निरास करण्याची अर्थमंत्र्यांची कल्पना अव्यवहार्य आहे हें उघड आहे.

तथापि उत्पादन वाढीची ही कल्पना आमच्या येथील उद्योगपतींना व व्यापारीवर्गाला सर्वथैव मान्य आहे व त्यांना ती अनेक दृष्टीनें सोईचीही आहे. उत्पादन वाढ हें आर्थिक धोरणाचें सूत्र असलें म्हणजे उत्पादनवाढीस ज्या गोष्टींनीं उद्योगपती व व्यापारी वर्गाच्या मतें आळा बसतो त्यांचा निरास करणें सरकारचें कर्तव्य ठरतें. या गोष्टी म्हणजे उत्पन्न व नफा यावरील कर, नियंत्रणें, वगैरे. हें सर्व करूनही उत्पादन वाढीची जबाबदारी उद्योगपतींवर मुळींच नसते. कारण कोळशाचा तुटवडा, मजुरांचे संप वहातुकीची गैरव्यवस्था, कच्च्या मालाचा तुटवडा, वगैरे अनेक लागू व गैरलागू कारणें सांगून त्यांस उत्पादनघटीचें, सरकारास समाधानकारक वाटणारें, उत्तर देतां येतें. किंमती वाढल्या तर उद्योगपती व्यापाऱ्यांना त्याचा दोष देतात तर व्यापारी तोच आहेर त्यांना परत करतात. आणि ही परस्पर देवघेव सरकार अगतिक होऊन प्रेक्षकाप्रमाणें पहात राहतें. गेल्या २–३ वर्षांतील कापड व त्याच्या किंमती, साखरेचा गोंधळ वगैरे कित्येक उदाहरणांवरून ह्या कल्पित कथा नसून सत्यसृष्टींतील घटना आहेत, हें सहज ध्यानांत येईल. या सर्व बाबतींत सरकारास वारंवार कटु अनुभव आलेला आहे. तरीसुद्धां हें धोरण बदलण्याचें त्यास वळत नाहीं. यावरून उद्योगपती व व्यापारी वर्ग यांची सरकारवर किती जबरदस्त पकड बसलेली आहे हें उघड होतें. डॉ. मथाई यांच्या अंदाजपत्रकामागील मीमांसासूत्राचें हें खरें इंगित आहे.

---

## शेअर बाजार कां वाढला नाहीं?

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्.)

तीन मारून टाकणारीं अंदाजपत्रकें एकामागून एक येऊन गेल्यानंतर डॉ. मथाईच्या यंदाच्या खड्यांचे देशांतल्या सर्व दृष्टिकोणांच्या प्रमुख मंडळींनीं स्वागतच केलें असतांना मुंबई शेअरबारांत अपेक्षित तेजी झाली नाहीं याचें पुष्कळांना कोडें पडून राहिलें आहे. बजेट दिवशींच्या सकाळच्या अधिवेशनांत डिफर्ड १७१० च्या आसपास व संध्याकाळीं बजेट नंतरही त्याच भावांत राहिला. उलट संध्याकाळीं एकदा १६७० पर्यंत खाली जाऊन आला. आतां बजेट नंतर सर्व मागण्या मांडण्यांचा पूर्ण विचार होऊन तें शेअरबाजाराच्या दृष्टीनें स्वागतार्ह आहे असें ठरलें असताही मागच्या शुक्रवारीं डिफर्ड १६७० बंद झाला.

भाव खाली आले आहेत याचा अर्थ बाजारांत तेजी झाली नाहीं असा करणे मात्र चुकीचा ठरेल. बजेटमध्यें येणाऱ्या अनुकूल योजना बाजारांत अपेक्षितच होत्या; व यंदाचे बजेट अनुकूल येणार. असा मागच्या सप्टेंबरांतल्या रुपयाच्या अवमूल्यनापासून होरा होता. नवीन कर येणार नाहींत व चालू करांत थोडीफार कपात होईल हें अर्थमंत्री व सरदार पटेल यांच्या वेळोवेळीं केलेल्या भाषणावरून बाजार गृहीतच धरून होता. तसेंच बाजाराला अवगुंठन करून टाकणारा डिव्हिडंड लिमिटेशन आर्डिनन्स त्याची चालूं ३१ मार्चला मुदत संपल्यानंतर पुन्हा चालूं ठेवण्यांत येणार नाहीं कारण त्यामुळें उद्योगधंद्यांची उत्तेजनहानी होते हें अर्थमंत्र्यांनींही ध्वनित करून ठेवलेलें होतेंच. तिसरें, लियाकतखान अर्थमंत्री असतांना त्यांनीं जातां जातां लत्ताप्रहार म्हणून बसवलेला तिरस्करणीय बिझिनेस प्रॉफिट टॅक्स हा पूर्णपणें उडविला जाईल, निदान त्याच्या दरांत तरी कपात होईल, हें बाजाराला वाटत होतें. या सगळ्यापेक्षा उत्साहजनक घटना म्हणजे, प्रमुख उद्योगधंद्यांनीं मागील वर्षांत केलेली उत्पादन वाढ, त्यातल्यात्यांत लोखंड, पोलाद, सिमेंट इत्यादि, आणि त्याबरोबर सुधारत रहाणारे मालक–मजूर संबंध या सर्व घटनामुळें शेअरबाजार मागच्या नोव्हेंबर पासून एकसारखा चढतच आलेला होता तो

(पान ७६ पाहा)

# कंपनी कायदा व आगामी सुधारणा

## ऑडिटरांवरील जबाबदारी

ले.:– "आशावादी"

आपल्या ता. २२ फेब्रुवारीचे अंकांत वरील मथळ्याखालीं एक प्रस्तावनावजा लेख आला आहे. मुंबई येथील शेअर-बाजाराचे कमिटीनें, शेअर होल्डर्स असोशिएशनचे सेक्रेटरींनीं व इतर संस्थांनीं याबाबत सरकारला लिहिलें व सरकारनें कांहीं सुधारणा करण्याचें प्रास्ताविक पत्रक काढलें. त्यांत पुष्कळ योग्य व वाजवी सुधारणाबद्दल लिहिलेलें आहे, व सरकारी पत्रकाचा गोषवारा आपण आपले पत्रांत दिल्यामुळें वाचकांना त्या-बाबतची माहिती झाली आहेच. त्याशिवाय कांहीं अधिक सुधारणा, शेअरहोल्डर्सच्या हितरक्षणाच्या दृष्टीनें मी नम्रपणें सुचवीत आहे. प्रत्येकीवर आक्षेप घ्यावयाचा म्हटल्यास, उत्तर पक्ष करून, घेतां येईल. तथापि भागीदारांचे हित पुढें ठेवून खालील सुधारणा कराव्यांत असें सुचवीत आहें, हें वाचकांनीं लक्षांत ठेवून यावें वाचन करावें. आपले वाचक आपलीं मतें व अनुभव सांगतील अशी आशा आहे.

१ वर्षअखेर–सरकारनेंच कंपन्यांचें, त्यांचे धंद्याप्रमाणें विभाग पाडून, त्या त्या विभागाला वर्षअखेर बांधून द्यावी म्हणजे त्या विभागांचे हिशोब ताडून पहाणें, सरकारला त्याचप्रमाणें भागी-दारांना, सोईचें पडेल. उदाहरणार्थ:–बँकांचे व्यवहार करणाऱ्या कंपन्यांनीं व पेढ्यांनीं ३१ डिसेंबरला आपापले हिशोब पुरे करावे. कापसाचा सीझन १ सप्टेंबरपासून धरतात तेव्हां कापसाचा व्यापार करणाऱ्या कंपन्या, सुताच्या व कापडाच्या गिरण्या यांनीं आपले हिशोब, ३१ ऑगस्टला पुरे करावेत. साखरेचे कारखाने, तेलें गाळणारे कारखाने आणि असेच इतर कारखाने यांनीं सीझन सुरू होतो त्याचे अगोदरचे महिन्यांत आपले हिशोब पुरे करावे. इतरांनीं ३१ मार्चला. यायोगें एका कारखान्याचे हिशोब त्याच धंद्यांतील इतर कारखान्यांचे हिशोबाशीं ताडून पहाणें सोपें जाईल. सध्या कांहीं गिरण्या ३१ मार्चला, कांहीं ३० जूनला कांहीं ३० सप्टेंबरला व कांहीं ३१ डिसेंबरला आपापले हिशोब पुरे करतात. त्यामुळें एका गिरणीच्या हिशोबाची व कामाची दुसऱ्या गिरणीच्या कामाशीं किंवा हिशोबाशीं तुलना करतां येत नाहीं.

२ ऑडिटर्स—निवडणूक–हिशोबतपासनिसांची निवडणूक वार्षिक सभेंत न होतां खालील पद्धतीनें व्हावी. एक महिना अगोदर एजन्टस् वा डायरेक्टर्सनीं सर्व शेअरहोल्डर्सना ऑडिटर्स निवडण्या-बद्दल लिहावें व ठराविक मुदतींत नांवें आल्यावर तीं सर्व शेअर-होल्डर्सकडे पाठवावीत व व्होटिंग पेपर शेअरहोल्डर्सनीं भरून त्या इलाख्याचे रजिस्ट्रारकडे पाठवावे व त्याचे ऑफिसनें मतें मोजून निकाल गॅझेटमध्यें प्रसिद्ध करावा व तो एजन्टसनीं सर्व शेअर होल्डर्सना कळवावा. याबाबतचे नियम, कंपनी कायदा सुधार-णेचा कायदा पास होईल त्यावेळीं मध्यवर्ती सरकारनें तयार करून प्रसिद्ध करावे. या पद्धतीनें, ऑडिटर्सना एजन्टसची मर्जी संभाळण्याची जरूरी पडणार नाहीं. त्याचप्रमाणें एक ऑडिटर एका कंपनीला लागोपाठ फक्त तीन वर्षें निवडतां येईल. त्यानंतर पुन्हा सहा वर्षें त्याला त्या कंपनीचें काम करतां येणार नाहीं अशी तरतूद असावी.

३ ऑडिटर्स–त्यांचीं सर्टिफिकिटें–माझी एक सूचना अशी आहे, कीं कायद्यानेंच खालील चार सर्टिफिकिटें देण्यास ऑडिटर्सना भाग पडावें. तीं येणेंप्रमाणें:– (अ) कंपनीचे स्टॉक बाबत जास्त दक्षता घ्यावयास पाहिजे. एजन्टसचें सर्टिफिकी-टावर हिशेबांत किंमती धरल्या जातात. कायद्यानेंच ऑडिटर्सना गेल्या वर्षांचे स्टॉकचे कागद, चालू वर्षाच्या कागदाबरोबर सर्व दृष्टीनें ताडून पहाणें भाग पाडावे. त्याचप्रमाणें स्टॉकचे, चालू वर्षाचे, त्या मागील, व निरुपयोगी असे तीन भाग पाडून त्याच्या किंमती निरनिराळ्या दाखवाव्यात व निरुपयोगी स्टॉक-वर योग्य घट काढून, त्याचा रिपोर्ट शेअरहोल्डर्सना त्यांनीं द्यावा. हे सर्व योग्य तऱ्हेनें केल्याचें त्यांनीं सर्टिफिकीट द्यावें. "स्टॉक" व "स्टॉकच्या किंमती" याबाबत पुष्कळ चलाखी करतां येते, ती थांबली पाहिजे. ऑडिटर्सना तांत्रिक व यांत्रिक माहिती नसते हें जरी खरें असलें तरी ही जबाबदारी जरूर तर तज्ज्ञांची मदत घेऊन त्यांना पार पाडतां येईल. मुद्दा एवढाच कीं, सध्याची ढिलाई जाऊन स्टॉक व स्टॉकच्या किंमती व्यवस्थित व योग्य तऱ्हेनें व वस्तुस्थितीला धरून हिशोबांत आल्या पाहिजेत, व तसें येण्यासाठी कायद्यांत योग्य सुधारणा होऊन ऑडिटर्सवर त्याची जबाबदारी ठेवावी. (ब) सस्पेन्स अकाउंटस. ज्यांना अनागोंदी कारभारच करावयाचा त्यांना 'सस्पेन्स अकाउंट' हें एक सोइस्कर खातें आहे. व्हाऊचर ऑडिट करतांना या खात्याकडे ऑडिटर्स लक्ष पुरवितात तथापि त्याबाबत निराळें सर्टिफिकीट देत नाहींत. तें देणें त्यांना कायद्यानें भाग पडावे, कीं या खात्याचा हिशेब सुव्यवस्थित व कायदेशीर आहे. मोठमोठाल्या कारखान्यांत दहा तारखेला पगार असतो परंतु सध्याचे निरनिराळे अलावन्सेस धरून व सोसायटी, ग्रेनशॉप व टी कॅन्टीन वगैरे वजा करून एक रक्कम आठ तारखेला सांगणें कठीण. तेव्हां ऑफीस मागील सरासरी धरून व दिवस पाहून एक मोठी रक्कम बँकेंतून आणते व ती जमाखर्च सस्पेन्स अकाउंटला होतो व १० तारखेला पगाराची शेवटची रक्कम कळल्यावर मग रीतसर खरा जमाखर्च केला जातो. हें सर्व ठीक. पण जेव्हां सस्पेन्स अकाउंटमधून रकमा कर्जी दिल्या जातात व इतर कांहीं व्यवहार त्या खातीं दाखविले जातात, त्यावेळीं ते योग्य व कायदेशीर नसतात. ऑडिटर्स (कांहीं कांहीं) त्याची फारशी दखल घेत नसावेत. यापुढें कायद्यानेंच त्यांना तसें करावयास लावावे. (क) आणखी एक सर्टिफिकीट त्यांनीं द्यावें कीं डायरेक्टर्स व एजन्टस यांचा खाजगी खर्च कंपनीवर पडलेला नाहीं. एजन्टसनीं कंपनीसाठी व स्वतःसाठी केलेला खर्च कंपनीवर पडूं नये. तो एजन्टसनीं आपल्या मेहनतान्यांतूनच दिला पाहिजे. मोटारी, प्रवास, टांगा, घोडी, गेस्ट हाऊस वगैरे अनेक खर्च एजन्टसचे असून ते कंपनीवर घातले जातात. त्यांना जो मेहनताना मिळतो त्यांतून हे सव व्हावयास पाहिजेत व तसें होत असल्याची ग्वाही ऑडि-टर्सनीं दिली पाहिजे. (ड) इन्कमटॅक्स रिपोर्ट. कंपनीनें म्हणजे एजन्टसनीं केलेले पुष्कळ खर्च इन्कमटॅक्स ऑफीस नामंजूर (इन्कमटॅक्सचा हिशोब करतांना) करते. अशा गोष्टींची माहिती डायरेक्टर्सनाही मिळत नसावी. यापुढें ऑडिटरनीं आपल्या रिपोर्टांत याबाबत सर्टिफिकीट जोडून, त्यांत नामंजूर रकमा व त्याचा तपशील शेअरहोल्डर्सना कळविला पाहिजे.

यापुढें ऑडिटर्सवर फार मोठी जबाबदारी पडणार आहे. वास्तविक ते शेअरहोल्डर्सचे प्रतिनिधी व ट्रस्टी. त्यांनीं शेअर-होल्डर्सचें हित प्रथम पाहिलें पाहिजे. सध्याच परिस्थितींत त्यांची नेमणूक वास्तविक एजन्टसच करतात. ऑडिटचे थोड्या फीशिवाय, पुष्कळांना इनकमटॅक्सचें काम मिळतें. त्यांत भरपूर मोबदलाही मिळतो. शिवाय एजन्टसचें खाजगी इनकम टॅक्सचें

काम मिळण्याचा संभव. तेव्हां त्यांना थोडेफार दडपणाखालीं कामें करावीं लागत असलीं पाहिजेत. सरकारी पत्रकाप्रमाणें कायदा बदलल्यास मग हिशेबतपासनिसांना फार मोठी जबाबदारी संभाळावी लागणार. ती संभाळणें व सध्याचे कांहीं कंपन्यांतून चालणारे व्यवहार कायदेशीर रीतीनें दाखविणें त्यांचें कर्तव्य; शेअरहोल्डर्सचे हिताचे रक्षणाची त्यांचेवर जबाबदारी, व या सर्वांचा संभाळ करण्याचें सामर्थ्य परमेश्वर त्यांना देवो व त्यांचे हातून "महाराष्ट्राचें औद्योगिक वैभव" वाढविलें जावो ही प्रार्थना.

### हिशेबांच्या पत्रकांत अधिक तपशिलाची आवश्यकता

वार्षिक हिशोब—कायद्यानें वार्षिक हिशोब कंपनीचें वर्ष पुरें झाल्यावर तीन महिन्यांचे आंत ऑडीट करून घेतले पाहिजेत व ते शेअरहोल्डर्सकडे पाठवून पांच महिन्यांच्या आंत जनरल मीटिंग पुढें ठेवले पाहिजेत. एका कारखान्याने १९४७ चे हिशोब १९४८ डिसेंबर मध्यें सभेपुढें ठेवले व १९४८ चे हिशोब नऊ महिन्यांनीं सभेपुढें आणले. यामुळें ते शिळे होतात व त्याकडे दुर्लक्ष होतें.

नवीन आखलेले बॅलन्सशीट, नफातोटापत्रक व मॅन्युफॅक्चरिंग व ट्रेडिंग अकाउंट यामध्यें पुष्कळच सुधारणा आहेत; तथापि त्यांत खालील जास्त सुधारणा व्हावयास पाहिजेत.

**Secured Loans** या सदराखाली 3 A.– Loans from Directors, 3 B–Loans from Mg. Agents, & 3C–Loans from others असे तीन विभाग, सध्याचे Loans from others चे पाडावे. त्याचप्रमाणें Unsecured Loans चेही.

**Fixed Deposits** या सदराला टीप जोडली जावी. त्यांत व्याजाचे निरनिराळे दर व त्या दराच्या ठेवी दाखविल्या जाव्यात व त्याचप्रमाणें फिक्सड डिपॉझिटचें इतर कर्जाबरोबर प्रमाण, भांडवलाबरोबर प्रमाण दाखविलें जावें. कायद्यानें फिक्सड डिपॉझिटच्या रकमेचें प्रमाण ठरविलें पाहिजे.

**Assets** असेटसच्या बाजूला Current Assets खाली तीन सदरे आहेत. ती आणखी विभागून जास्त माहिती दिली जावी. Stores व Spare parts याची विभागणी करून Stores हे एक सदर व Spare parts हें दुसरें सदर करावे; व या प्रत्येक सदराचे तीन विभाग पाडून खालील माहिती दिली जावी.

1. Stores–Bought this year Rs.
2. „ „ last year Rs.
3. Unserviceable stores Rs.—— / Less written down Rs.—— } Rs.

त्याचप्रमाणें Spare parts व Loose Tools ची माहिती वरील तीन सदरामध्यें दिली जावी. ही गोष्ट महत्त्वाची आहे व यांत जेवढा जास्त खुलासा दाखविला जाईल तेवढा जरूर आहे व त्या मुळें खरी वस्तुस्थिति शेअरहोल्डर्सपुढें मांडली जाईल.

**Stock-in-Trade** stating mode of valuation याला खालील टीप जोडावी. "If different from last year in any way then please state in what way it is so." मला वाटतें अमेरिकन कंपनी कायद्यांत असें कलम आहे. त्यानंतर Stock in Trade खालीलप्रमाणें विभागावा.

D i Raw materials bought this year Rs.
ii „ „ „ last „ Rs.
iii „ „ deteriorated Rs. / Less written down Rs. } Rs.

D iv Process Stock this year Rs.
v „ „ Last year / or old Rs.

D vi Finished stock this year Rs.
vii „ „ last „ Rs.
viii „ „ unsaleable Rs. adjustable / Less adjustment Rs. } Rs.

III b Sundry Debtors मध्यें ही खालीलप्रमाणें विभाग पाडावेत—(i) Debts formed this year Rs.
ii „ „ last „ Rs.
iii „ over two years Rs.

वरीलप्रमाणें भाग विभाग पाडल्यासच खरी वस्तुस्थिति झांकून राहणार नाहीं व एजन्टसचे व्यवहार व कतृत्वावर प्रकाश पडेल. ऑडिटर्सनाही त्यामुळें कमी अडचण, कारण कायद्यानेंच वरील हिशोब पुढें ठेवलाच पाहिजे,

**Profit and Loss a/c** यामध्येंProvision for depreciation of fixed assets हें सदर आहे. पण त्याला एक पुस्ती जोडणें अगत्याचें आहे. ती म्हणजे वरील रकमेबरोबरच "Statutory Depreciation" ची रकम टीपेंत दाखविली जावी. Income-Tax Return साठीं ती काढावी लागतेच. म्हणजे डिप्रीसिएशन (घसारा) याबाबतची खरी माहिती शेअरहोल्डर्सपुढें ठेविली जाईल.

त्याचप्रमाणें Overhead Charges, Interest, Repairs निरनिराळे दाखवावे. मुख्य मुद्दा हा कीं, जितकी जास्त माहिती देतां येईल तितकी देण्यांत यावी; एक रकमेंत दाखविली जाऊं नये.

**Manufacturing and Trading account** यामध्येंही मॅन्युफॅक्चरिंग एक्स्पेनसेस व ट्रेडिंग एक्स्पेनसेस यामध्यें निरनिराळ्या खात्यावर खर्च झालेली रकम त्या त्या खात्यावर पोट कॉलममधें दाखवून त्याची बेरीज या दोन सदरासमोर दाखवावी. त्यामुळें शेअर होल्डर्सना पूर्ण कल्पना येईल कीं, हे बारिकसारिक खर्च कसे चालू आहेत. त्याचप्रमाणें जनरल एक्स्पेनसेसचें एक निराळें सदर जोडावें.

वरीलप्रमाणें खर्चाची व इतर खातीं विभागून दाखविल्यास एजन्टसची कामगिरी, व्यवहार, व्यवस्था ही शेअरहोल्डर्सपुढें आपोआप स्पष्टपणें येतील व असे आकडे कायद्यानेंच देणें जरूर झाल्यास बाह्यतः ते आपलीं घरें सुधारतील. "इनकमटॅक्स कसे चुकवितात" या दोन लेखांत त्या लेखकानें काळ्या स्वरूपाचे व्यवहार कसे चालतात हें दाखविलें आहे. त्यास पूर्णतः आळा घालणें कठीण. पण वरील पद्धतीनें हिशोब दाखविल्यास व मी सुचविलेल्याप्रमाणें एका धंद्याच्या कंपन्यांचें वर्ष एका ठराविक तारखेस सुरूं केल्यास चांगल्या कंपनीचें कामकाजाची दुसऱ्या कंपनीचें कामकाजाशीं तुलना करून दुसऱ्या कंपनीला शेअरहोल्डर्सना जाब विचारतां येईल.


## प्रचारक नेमावयाचे आहेत.

मुंबई प्रांत, वऱ्हाड, मध्यप्रांत व निजाम संस्थानांत प्रचारक नेमावयाचे आहेत. पगार व कमिशन दोन्हीही मिळतील. शिवाय चालू व्यवसाय सांभाळून काम करतां येईल.

माहितीसाठी लिहाः—
मॅनेजिंग डायरेक्टर,
दी आदर्श कृषिसंस्था लि., नवग्रही,
धुळें (प. कान्हदेश.)

## रेल्वेचा आर्थिक कारभार सुधारत चालला

(मा. म. काळे)

गेलीं चार पांच वर्षे हिंदच्या बिकट आर्थिक परिस्थितीचा विचार करतांना, रेल्वेच्या वहातुकीची असमाधानकारक परिस्थिति हें एक महत्त्वाचें कारण लक्षांत येत असे. परंतु गेल्या वर्षी रेल्वेच्या वहातुकीची परिस्थिति बरीचशी सुधारली आहे व त्यामुळें उत्पादन आणि व्यापार यांतील अडचणी बऱ्याचशा दूर झाल्या आहेत,' असें अंदाजपत्रक सादर करतांना रेल्वेमंत्र्यांनीं केलेल्या भाषणावरून दिसून येतें. लोकोमोटिव्हजच्या पुरवठ्याच्या बाबतींतहि परिस्थिति सुधारली असून विशेष समाधानाची गोष्ट ही की चालू वर्षापासूनच चित्तरंजन येथील कारखान्यांत इंजिनें बांधावयास सुरवांत होणार असून लौकरच इंजिनांच्या बाबतींत हिंद स्वयंपूर्ण होईल. रेल्वेच्या कारभाराचा आर्थिक दृष्ट्या विचार करतां इंजिनें हिंदमध्यें तयार होणें अत्यंत आवश्यक होतें. रेल्वेंत गुंतविलेल्या भांडवलावर ४ टक्के या दरानें डिव्हिडंडची तरतूद करण्यासाठी ३१ कोटी, ८५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. पुढील वर्षी १४ कोटी रुपये नफा होईल असा अंदाज असून रेल्वे सुधारणा निधींत १० कोटी, रेल्वे राखीव निधींत २ कोटी १ लक्ष, व घसारा निधींत २ कोटी रुपये याप्रमाणें तरतूद करण्यांत आली आहे. रेल्वेच्या कारभाराची जमाखर्चाच्या दृष्टीनें परिस्थिति सुधारत असली तरी पुढील वर्षी तिकिटाच्या दरांत व मालवहातुकीच्या दरांत कोणताहि बदल करण्यांत यावयाचा नाहीं. वाघिणीच्या पुरवठ्याच्या बाबतींत परिस्थिति जास्त सुधारण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. गाड्यांच्या वक्तशीरपणांत जास्त सुधारणा झाली आहे. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची गर्दी व त्यांना विशेष सुखसोई नसणें या गोष्टी जवळ जवळ तशाच चालू आहेत. निदान जास्त गाड्यांची तरतूद करून उतारूंची गर्दी कमी करण्याचे प्रयत्न त्वरित केले जाण्याची आवश्यकता दिसते.

स्वतंत्र हिंदचें रेल्वे खातें आतां पूर्णपणें राष्ट्रीय मालकीचें झालें आहे. या दृष्टीनें नोकरवर्गाची कार्यक्षमता वाढली पाहिजे. परंतु कामगारांची उत्पादनक्षमता १९३९ सालीं १०० होती ती गेल्या वर्षी ६९.६८ इतकी उतरली आहे. रेल्वे खात्यानें कामगारांना पगाराचें स्केल, स्वस्त धान्याचीं दुकानें इ. सोई पुरविल्या आहेत. धंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाच्या प्रश्नाचा विचार करतांना रेल्वेच्या परिस्थितीकडे साहजिकच लोक पाहातात व या दृष्टीनें सर्व तऱ्हेच्या कार्यक्षमतेची अपेक्षा करतात. रेल्वेच्या आर्थिक कमिशनरांनीं निवेदन केल्याप्रमाणें या वर्षापासून सर्व संस्थानी रेल्वे हिंदच्या रेल्वेमध्यें समाविष्ट करण्यांत आल्या आहेत व सर्व हिंदची एकत्रित सुसंबद्ध व्यवस्था निर्माण झाली आहे. सर्वसाधारण हिंदच्या जमाखर्चामध्यें रेल्वेचें निश्चित स्थान काय हें नुकत्याच ठरविल्या गेलेल्या व्यवस्थेप्रमाणें निश्चित करण्यांत आलें आहे. आणखी विशेष महत्त्वाची तिसरी गोष्ट म्हणजे नवीन पद्धतीच्या वाघिणी व उतारूंचे डबे बांधणें व इंजिनांच्या उत्पादनाला सुरवात करणें ही होय. ह्या गोष्टीमुळें आर्थिक दृष्ट्या रेल्वेचा कारभार कार्यक्षम बनेल व रेल्वेपासून होणारा सर्व फायदा हिंदच्या अर्थव्यवस्थेच्या कामीं उपयोगी पडेल. हिंदच्या मालकीची एकंदर रेल्वे ३३,०८४ मैल लांबीची झाली असून एकंदर रेल्वेच्या कारभारांत व्यवस्थेच्या दृष्टीनें कार्यक्षमता निर्माण करण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत. कदाचित् कारभाराच्या सोईसाठी रेल्वेचे सात विभाग पाडले जातील. कांहीं रेल्वेरस्त्यांचें इलेक्ट्रिफिकेशन करणें आवश्यक आहे. परंतु ही गोष्ट सरकारनें जाहीर केलेल्या धरणांच्या योजना पूर्ण होऊन त्यांमुळें स्वस्त वीज–पुरवठा होण्याच्या यशस्वितेवर अवलंबून राहाणार आहे. म्हणजेच, इतर बाबतींत आर्थिक परिस्थिति सुधारली कीं तिचे सुपरिणाम रेल्वेच्या कारभारावरही दिसून येतील.


# दि सांगली बँक लि.

(स्थापना १९१६)

(शेड्यूल्ड बँक)

मुख्य ऑफिस : सांगली.

**शाखा**

(१) मुंबई.
(२) शहापूर (३) कराड
(४) रबकवी (५) शिरहट्टी
(६) तेरदाळ (७) मंगळवेढें
(८) कवठें महांकाळ (९) उगार
(१०) विलिंग्डन कॉलेज (११) वानलेसवाडी

**ठेवींचे दर**

करंट ........ द. सा. द. शें. ०—८—०
सेव्हींग ........ द. सा. द. शें. १—८—०

मुदत ठेव

१ वर्ष ........ द. सा. द. शें. २—०—०
३ वर्षे ........ द. सा. द. शें. २—८—०
५ वर्षें ........ द. सा. द. शें. ३—०—०

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. ह. व. कुलकर्णी (चेअरमन).
शेठ बा. अ. आरवाडे. शेठ शं. ग. गाडगीळ.
शेठ लि. खे. शहा. शेठ घ. ल. आरवाडे.

सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

पु. श्री. मोकाशी,
मॅनेजर.

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,२३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार

या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार — मॅनेजर
भ. अं. दप्तरदार, बी. ए. — चेअरमन.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

बेडेकर पापड वापरा.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

जास्त माहितीसाठी मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरीः—५५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखाः—( १ ) भवानी पेठ. ( २ ) सदाशिव पेठ.

बाहेरगांवच्या शाखाः— (१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.

DR. WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER

उंची कपड्याचा व स्नानाचा
उत्तम साबण
निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा)

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीमद् वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.